# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०२/२०२५ (मंगळवार) संध्याकाळ**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करून पोलीसांना बनावट परवाना दाखविणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन आरोली** :—दिनांक २४/०२/२०२५ चे १२.१० वा.ते १५.०० वा. अरोली पोलीस गुन्हे तपास कामी खात येथे गेले होते. पोलीस तपास करून खात येथुन परत येत असतांना मौजा वारेगाव खात येथे एका घरासमोर अशोक लेलॅन्ड कंपनीचा रेतीने भरलेला १० चक्का टीप्पर क्र एम एच ४० बी.एल २४५२ चा चालक हा टिप्पर खाली करतांना मिळुन आला . चालक नामे सोनु सुनील तपासे, वय २९ वर्ष, रा. मोहाडी ता.मोहाडी,जि.भंडारा आणि क्लिनर दुर्गेश मंसाराम रहेकवार, वय ३० वर्षे, रा.रोडा ता.मोहाडी जि.भंडारा यांना त्यांचे ताब्यातील टीपर मधील खाली केलेल्या रेती वाहतुकीचा परवाना मागीतला असता, टीपर चालक आणि क्लिनर यांनी त्याचेकडील रेती परवान्याची प्रत दाखविली. तसेच टिप्पर मालका बाबत विचारपुस केली असता मालक मंगेश हसंराज बारबया, वय ३३ वर्षे, रा. धानला ता.मौदा जि. नागपुर अशी माहीती प्राप्त झाली. आरोपीतांनी दाखविलेला परवाना खोटा असल्याबाबत पोलीसांना शंका आल्याने त्यांनी सदर बाबतीत तात्काळ तहसीलदार, मौदा यांच्या कडुन अभिप्राय मागविला तहसीलदार यांनी सदर टिप्परचे रेती वाहतुक ई.टी.पी.क्रं.२२९८५९८४ चा परवाना हा खोटा व बनावटी असल्याचा लेखी अभिप्राय दिला. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ४ ब्रास रेती किंमती २०,०००/रूपये आणि २) टीप्पर क्र एम एच ४० बी.एल २४५२ किंमती २५,००,०००/—रूपये ३) २ अॅड्रॉईड फोन किंमती २०,००० /— रूपये असा एकुण २५,४०,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी टीप्पर क्र एम एच ४० बीएल २४५२ चा **चालक आरोपी क्र १.सोनु सुनील तपासे, वय २९ वर्षे, रा. मोहाडी ता.मोहाडी,जि.भंडारा , क्लिनर आरोपी क्र २ दुर्गेश मंसाराम रहेकवार, वय ३० वर्षे, रा.रोडा ता.मोहाडी जि.भंडारा आणि वाहन मालक मंगेश**

**हसंराज बारबया, वय ३३ वर्षे, रा. धानला ता.मौदा जि.नागपुर** यांच्या विरूध्द कलम ३०३(२),३३६(२),३३६(३),३(५),४९ बी.एन.एस. सहकलम ४८(७)४८(८)महा.ज.मह.का. १९६६ सहकलम ४,२१खानी ख.अधी.(विकास व नियमन) सहकलम ३ सा.मा.नू.प्रती. अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी क्रमांक १ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर